# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
# प्रेसनोट

**CB 62/2026**

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक ०९/१०/२०२६

**२ किलो ५०० ग्रॅम मेफेड्रान (MD) आणि ५६६ ग्रॅम कोकेन सह नायजेरीयन इसमास अटक**
**नवी मुंबई अंमली पदार्थ विरोधी कक्षाची उत्कृष्ठ कामगिरी**

मा.श्री.मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, मा.श्री. दीपक साकोरे सह पोलीस आयुक्त, मा.श्री.प्रमोद शेवाळे अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे), मा.श्री.सचिन गुंजाळ पोलीस उप आयुक्त (गुन्हे) यांनी नवी मुंबई अंमली पदार्थ मुक्त करण्याचे व त्याचा व्यापार करणाऱ्या इसमांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दिनांक ०८/१०/२०२६ रोजी नवी मुंबई पोलीसांच्या अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने सापळा कारवाई करुन अफ्रिकन इसम नामे ॲनी इकेच्युक्वु डार्लीग्टन(ANI IKECHUKWU DARLINGTON) वय-४१ वर्षे, अंबिका बिल्डींग, रोहींजण गाव, तळोजा मुळ रा.Nigeria यास ताब्यात घेवून १) ६,६३,०००/- रु. किंमतीचा २२१ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला तसेच त्याचे घरझडतीमध्ये २) ६८,२८,५००/- रु. किंमतीचा २२७६ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन आणि ३) २,८३,००,०००/- रु. किंमतीचा ५६६ ग्रॅम वजनाचा कोकेन तसेच अंमली पदार्थ खरेदी-विक्री करीता लागणारे इतर साहीत्य असा **एकुण ०३,५७,९१,२००/- किंमतीचा** मुद्देमाल अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने त्याच्या विरुध्द तळोजा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ४८०/२०२६ एन.डी.पी.एस.कायदा कलम ८(क), २१(क), २२(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यास दि. ०८/१०/२०२६ रोजी २१:३० वा. अटक करण्यात आली आहे.

सदर आरोपीत याचेविरुध्द एनसीबी मुंबई यांचेकडे यापूर्वी गुन्हा रजि. क्र. ४९६/१९ प्रमाणे एनडीपीएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असुन या केसमध्ये आरोपी तब्बल ०७ वर्षे कारागृहवासात होता त्याची नुकतीच २०२५ मध्ये जामिनावर मुक्तता झाली आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालया अंतर्गत सातत्याने अंमली पदार्थ विरोधी कारवाया करण्यात येत असून अंमली पदार्था च्या बेकायदेशीर व्यापाराशी निगडीत ०२ टोळींवर मोक्का कायद्यांतर्गत तसेच ०१ पुरुष आणि ०१ महीला आरोपींविरुध्द पिट एनडीपीएस कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे. मागील ०५ वर्षांमध्ये अंमली पदार्थ विरोधी २३८७ केसेस दाखल करुन ३२०० आरोपींना अटक करण्यात आली आहे यात एकूण १,०७८ किलो ग्रॅम वजनाचा एकूण १५० कोटी किंमतीचा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकडून अंमली पदार्थ विषयी गोपनिय माहीती देण्याकरीता ८८२८११२११२ हा हेल्पलाईन क्रमांक उपलब्ध आहे.

सदर कारवाई मा.श्री.डॉ.विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे, सपोनि निलेश धुमाळ, सपोनि तुषार माने, सपोनि गणेश पाटील, पोहवा/१३७७ रमेश तायडे, पोहवा/४४६२ अंकुश म्हात्रे, पोशि/३०६१ ज्ञानेश्वर चव्हाण, पोशि/३१५८ सुदाम पालवे, पोशि/१२३९३ प्रशांत खिल्लारे, पोशि/१२४२४ एकनाथ पारधी, पोशि/५०६४ सचिन राठोड, मपोहवा/२५२७ सुरेखा दळवी, मपोहवा/२७९४ हेमांगी पाटील व चालक पोहवा/४७६१ पाटील या पथकाने केली आहे.